# १३ व्या विधानसभेचे शेवटचे अधिवेशन- जून/जुलै, २०१९ अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मा.अध्यक्ष महोदयांनी विधानसभेत व्यक्त केलेल्या भावना...

- विधानसभेतील सर्व सन्माननीय सदस्य... आपणा सर्वांना माझा सस्नेह नमस्कार! आपणा सर्वांना कल्पना आहे की, आज केवळ या अधिवेशनातीलच कामकाजाचा अखेरचा दिवस नाही तर सन २०१४ ते २०१९ या कालावधीसाठी गठीत झालेल्या १३ व्या विधानसभेच्या अधिवेशन कालावधीचा शेवटचा दिवस आहे. १३ वी विधानसभा गठीत झाल्यावर आपण सर्वांनी माझी १२ नोव्हेंबर २०१४ रोजी विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड केली. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष या पदाला अनुभव संपन्न आणि अभ्यासू नेतृत्वाची परंपरा लाभलेली आहे.
- माझ्या सारख्या एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि पुढे शेती हाच व्यवसाय करायचा असे ठरवलेल्या शाळकरी विद्यार्थ्याचा शाळेत असल्यापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला. राष्ट्रभक्तीच्या विचाराने प्रेरित होऊन मी गावपातळीपासून संघटनेत अनेक वर्षे विविध पदांवर काम केले. १९७२ च्या दुष्काळात राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाच्या दुष्काळ निवारण समितीचा मी औरंगाबाद जिल्हा कार्यवाह होतो. १९७५ ला आणीबाणीच्या विरोधात सत्याग्रहींना एकत्र करुन दर आठवडयाला एक सत्याग्रहींची तुकडी सत्याग्रह करेल याद्दष्टीने नियोजन करण्याची जबाबदारी माझ्याकडे होती. तो काळ अतिशय भीतीदायक वातावरणाचा, दडपशाहीचा, अशांतता आणि अस्वस्थतेचा होता, मात्र माझी ध्येयनिष्ठा विचलीत झाली नाही. याउलट, अशा संकटांचा तीव्र विरोध करायलाच हवा असे रोजच्या रोज वाटत होते ज्यामुळे पुढील काळातही लोकहितासाठी संघर्ष करीत राहण्याचे बळ मिळाले. त्या वेळच्या राजकीय प्रवाहाच्या विरुध्द वाटचाल करण्याचे धोरण आणि राष्ट्रभक्तीचा विचार लोक स्वीकारतील असा मनात विश्वास असल्याने तो पुढे नेण्यासाठी मी सर्वस्वी प्रयत्न करीत राहिलो.

- १३ व्या विधानसभेच्या कामकाजाचे संचालन करीत असतांना दोन्ही बाजूंना योग्य संधी आणि न्याय देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. बऱ्याचदा वेळेअभावी अनेकांना संधी देता आली नाही. त्यामुळे काही वेळा दोन्हीकडचे सन्माननीय सदस्य माझ्यावर नाराज व्हायचे. पण ही नाराजी तेवढया वेळेपुरतीच मर्यादित राहीली हा त्या सन्माननीय

सदस्यांच्या मनाचा मोठेपणा मी मानतो. सर्वांचे उत्तम सहकार्य लाभले याचे समाधान आहे. ही आपली १३ वी विधानसभा काही महत्वाच्या वैशिष्टयपूर्ण घटनांची साक्षीदार ठरली. पाच वर्षात तीन विरोधी पक्षनेते या विधानसभेने बघितले. त्यापैकी पहिल्या दोघांनी मुख्य प्रवाहात सामील होणे पसंत केले. विधानसभा गठीत झाल्यानंतर पहिल्या अधिवेशनात मा.श्री.एकनाथजी शिंदे हे विरोधी पक्षनेते पदी होते. नंतर शिवसेना पक्षाने भाजपाशी युती करण्याचा निर्णय घेतल्यावर ते मंत्री झाले. १३ व्या विधानसभेच्या या अखेरच्या अधिवेशनात मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे विरोधी पक्षनेते पदाचा त्याग करुन भाजपात प्रवेशकर्ते झाले आणि ते आता गृहनिर्माण मंत्रीपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. मा.श्री.विजयराव वडेट्टीवार हे, या अखेरच्या अधिवेशनात तिसरे विरोधी पक्षनेते ठरले आहेत. या सरकारचे दोन मंत्रीमंडळ विस्तार विधानभवन प्रांगण आणि मध्यवर्ती सभागृह विधान भवन येथे झाले. उपराजधानी नागपूर म्हंटले की हिवाळी अधिवेशन आपल्या डोळयासमोर येते. मात्र १३ व्या विधानसभेने जुलै २०१८ मध्ये पावसाळी अधिवेशन नागपूर मध्ये घेतले. या अगोदर अशा प्रकारची फक्त तीन पावसाळी अधिवेशने

नागपूरात झाली आहेत. प्रचंड पावसामुळे एक दिवस सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले. हा प्रसंग आपणा सर्वांच्या विशेष आठवणीत राहिल.

- १३ व्या विधानसभेच्या कालावधीतच १७ व्या लोकसभेसाठी निवडणूक झाली आणि पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांच्यावर राज्यातील आणि देशातील जनतेने पुन्हा विश्वास दाखवत त्यांना लोकसेवेची आणखी एक संधी दिली.
- या पाच वर्षात विधानमंडळाच्या विविध अधिवेशन काळात सन्माननीय विधिमंडळ सदस्यांसाठी विधानमंडळात अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नवनिर्वाचित सदस्यांसाठी २ दिवसीय संसदीय वर्ग, स्वीय सहाय्यकांसाठी कार्यशाळा, बदलत्या हवामानाच्या समस्येसंदर्भात पर्यावरण संवर्धनासाठी परिसंवाद, कृषी समस्या आणि विकासासंदर्भात तज्ञांचे व्याख्यान, मराठी भाषा दिनाचे आयोजन आणि मराठी अभिमान गीताचे सामुहिक गायन, विधानपरिषदेचे माजी सभापती आणि माजी राज्यपाल दिवंगत श्री.रा.सू.गवई यांच्या स्मृतीग्रंथाची निर्मिती आणि प्रकाशन हे उपक्रम वैशिष्ट्यपूर्ण ठरले. दिवंगत कृषि मंत्री आणि विधान परिषदेचे माजी

विरोधी पक्षनेते, माजी लोकसभा सदस्य श्री.भाऊसाहेब तथा पांडुरंगजी फुंडकर यांचा स्मृतिग्रंथ देखील पूर्णत्वाच्या मार्गावर असून त्याचा प्रकाशन समारंभ आपण लवकरच आयोजित करीत आहोत.

- आपणा सर्वांच्या सहकार्याने आणि योगदानामुळे तेराव्या विधानसभेचा हा कार्यकाल जनसामान्यांच्या अनेक प्रश्नांना न्याय देणारा आणि जनसामान्यांना दिलासा देण्यासाठी मंजूर केले गेलेले अनेक कायदे, घेतलेले लोकहिताचे निर्णय याद्दृष्टीने महत्वाचा ठरला. संमत लोकहिताच्या कायद्यांची संख्या मोठी आहे. ज्यापैकी अनेक कायदे ऐतिहासिक ठरणारे आहेत. या विधानसभेत आपण मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर केला. या कायद्याचा मसुदा अतिशय काळजीपूर्वक तयार करण्यात आलेला आहे. काहींचा त्यास प्रचंड विरोध असून सुध्दा तो न्यायालयात टिकला आणि टिकणार आहे याचे मला मनस्वी समाधान आहे. शिक्षणाचे सार्वत्रीकरण आणि राज्याच्या शैक्षणिक उन्नतीच्या दृष्टीने सन २०१४ ते २०१९ या काळात स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांची संख्या १८ ने वाढून २० झाली आहे.

तसेच डॉ.होमी भाभा क्लस्टर विद्यापीठ नव्याने स्थापीत करण्यात आलेले आहे ही बाब मला उल्लेखनीय वाटते.

- मुंबईतील सन्माननीय सदस्यांची निवास व्यवस्था योग्य असणे आवश्यक आहे. मनोरा आमदार निवासात वास्तव्य असणाऱ्या सन्माननीय सदस्यांकडून केल्या गेलेल्या तक्रारी आणि निवास कक्षातील छताचा भाग पडल्याच्या घटना, त्यानंतरचा इमारत धोकादायक असल्याचा संरचनात्मक तपासणी अहवाल यानुसार येथे पुनर्बांधणीचा निर्णय घेण्यात आला आहे. निवासी कक्षांसाठी वाढीव चटई क्षेत्राची मागणी पूर्ण करणारे आणि मुबलक निवासी कक्ष संख्या असलेले सुसज्ज नवीन मनोरा आमदार निवास सन २०२२ पर्यंत आपल्या सेवेसाठी तयार असेल.
- ऑक्टोबरमध्ये होऊ घातलेल्या १४ व्या विधानसभा निवडणुकीसाठी मी आपणा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. जनताजनार्दन ही लोकशाहीतली फार मोठी शक्ती आहे. जनतेच्या आशीर्वादाने आपल्यापैकी अनेकजण येथे पुन्हा येतील अथवा न येतील पण समाजकारणासाठी मात्र यापुढेही सभागृहात किंवा सभागृहाबाहेर आपण कार्यरत राहूया. वरुणराजाने यंदा कृपादृष्टी दाखवावी आणि

शिवारं जलयुक्त करावी अशी प्रार्थना करुन मी आपणा सर्वांना १४ व्या विधानसभेत परतीचे निमंत्रण वजा शुभेच्छा देतो.

**असू आम्ही सुखाने पत्थर पायातील**
**मंदिर उभविणे हेच आमुचे शील**

जीवनात याच अपेक्षेने कामाला सुरुवात केली आणि जनतेने, माझ्या पक्षाने, लोकशाहीच्या या महामंदिरातील सर्व पक्षीय २८८ सन्माननीय सदस्यांनी, सर्व पक्षाच्या नेत्यांनी तसेच मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी मला कळसापर्यंत जाण्याची संधी दिली त्याबद्दल या सर्वांच्याप्रति मी आभार व्यक्त करतो आणि येथेच थांबतो, धन्यवाद.

**जय हिंद ,**
**जय महाराष्ट्र...**